# बीड नगरपरिषदेचा भ्रष्ट लेखापाल गणेश पगारे कारवाईच्या रडारवर ?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564






■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १८५ ■ सोमवार दि.२४ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 185 ■ Monday Dt. 24 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# मुख्याधिकारी नीता अंधारे व गणेश पगारे यांचा कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचारात लागेबांधे ?

## नगरपरिषदेमध्ये केलेला २०० कोटींचा घोटाळा नीता अंधारे व गणेश पगारेला येणार अंगलट?

### मुख्याधिकारी नीता अंधारे ह्या गणेश पगारे यांच्यामुळे येणार अडचणीत?


### लेखापाल गणेश पगारेंवर योग्य कारवाई करण्याची आयुक्त संचालकांचे आश्वासन?

### नगरपरिषदेतील लेखापाल गणेश पगारेंचा पदभार लवकरच निघणार?

### बीड न.प.मध्ये एक हत्ती सत्ता गणेश पगारे हे राजकीय नेत्यांच्या हाती चालवत आहे?

### गणेश पगारेंची मुलगी नगरपरिषदेमध्ये स्वच्छता कर्मचारी म्हणून, पण मुंबईच्या बँक अकाउंटला पगार जमा होतात पदाचा गैरवापर गणेश पगारे हे करत आहे?

## लेखापाल गणेश पगारेंचे अनेक कारनामे आले बाहेर; सीबीआय व २६९ कलमानुसार गुन्हा दाखल असल्यामुळे गणेश पगारेंच्या अडचणीत वाढ?


जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

फोन क्र. 02442-222604
ईमेल-beeddpo@gmail.com
ईमेल-dpobeed@yahoo.com

नगरपरिषद प्रशासन विभाग,
नगर रोड, बीड.
बीड, पिन 431122

जा.क्र.2025/नविवि/श्री पगारे/लेखापाल/पदभार/कावि-३।।

दि.18.03.2025

प्रति,
मा.आयुक्त तथा संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय
7 वा मजला, बेलापूर भवन, सेक्टर 11
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – 400 614.

विषय : श्री गणेश तुळशीराम पगारे, लेखापल, नगर परिषद बीड यांचेकडील पदभार त्वरीत काढणेबाबत.

संदर्भ : श्री दिपक थोरात, संपादक सायं.दै.महाराष्ट्र आरंभ यांचे निवेदन दि.06.03.2025 (या कार्यासनास प्राप्त दि.18.03.2025)

महोदय,
वरील संदर्भीय विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, श्री दिपक थोरात, संपादक सायं.दै.महाराष्ट्र आरंभ यांचे निवेदन दि.06.03.2025 या कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर निवेदनात त्यांनी बीड नगर परिषद मधील सहाय्यक लेखापाल श्रेणी क गणेश तुळशीराम पगारे विरुध्द केंद्रीय अन्वेषण ब्युरो, नवि दिल्ली येथे चौकशी चालू आहे. तसेच उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे क्रिमीनल प्रकरण क्र W.P.No. 269/2023 प्रकरण चालू आहे. संबंधीत खात्याचे पत्र आपल्याकडे आलेले आहेत. आतापर्यंत गणेश तुळशीराम पगारे कडील पदभार का काढला नाही. गणेश तुळशीराम पगारे श्रेणी-क लेखापाल नगर परिषद, बीड पदाचा तात्काळ पदभार काढून घेण्यात यावे, अशी नम्र विनंती केली आहे.
करिता संदर्भीय निवेदनाची छायांकित प्रत यासोबत पुढील कार्यवाहीस्तव आपणाकडे सविनय सादर करण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(टी.डी. कांबळे)
जिल्हा सह आयुक्त,
नगरपरिषद प्रशासन विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय बीड

O/C

प्रत:-1. मा.सह आयुक्त / उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. श्री दिपक थोरात, संपादक सायं.दै.महाराष्ट्र आरंभ,थोरातवाडी जुने एस पी ऑफीस जवळ,बीड यांना माहितीस्तव.

ISSUED COPIES (03)
20 MAR 2025
District Collector Office
Beed

३२/EST/general file

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेचा वादग्रस्त भ्रष्टाचाराने बरबटलेला लेखापाल गणेश पगारे यांना वाचविण्यासाठी मुख्याधिकारी नीता अंधारे यांचे प्रयत्न सुरू असून, लेखापाल गणेश पगारे यांचा केंद्रीय अन्वेषण ब्युरो, नवी दिल्ली येथे चौकशी चालू आहे. तसेच उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे क्रिमीनल प्रकरण क्र थ.झ.छे. २६९/२०२३ प्रकरण चालू आहे. संबंधीत खात्याचे पत्र आपल्याकडे आलेले आहेत. आतापर्यंत गणेश पगारे कडील पदभार का काढला नाही. गणेश पगारे श्रेणी क लेखापाल नगर परिषद, बीड पदाचा तात्काळ पदभार काढण्यात येणार असल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकारी नीता अंधारे व लेखापाल गणेश पगारे यांनी २०० कोटी रुपयांचा घोटाळा हा कागदपत्रे रस्ते दाखवा सिमेंट रोड नाली खरंच बीड नगर परिषद लुटण्याचा काम केलेला आहे. बीड नगर परिषदेच्या वसुली विभागातून कोट्यावधी रुपये गायब झालेले आहेत. तर बीड नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागातील मोठा गोंधळ पाहायला मिळत आहे. गणेश पगारे नीता अंधारे या एक यात माळीचे मनी असे आहेत म्हणाला हरकत नाही. कारण बीड नगर परिषदेच्या दोनशे कोटीच्या घोटाळ्यामध्ये मुख्याधिकारी नीता अंधारे व लेखापाल गणेश पगार यांनी संगनमत





करून मोठा घोटाळा केला आहे. बीड नगर परिषदेतील लेखा विभाग, आस्थापना विभाग, पाणीपुरवठा विभाग, दलित वस्ती, निधी बांधकाम विभाग, विद्युत विभाग, वसुली विभाग तसेच अनेक बीड शहरातील नगर परिषदेच्या मालकीचे भूखंड ही गुत्तेदारांच्या घशात घातलेले आहेत. त्यामुळे मुख्याधिकारी नीता अंधारे व लेखापाल गणेश पगारे यांच्या शासनाकडे अनेक तक्रारी गेलेल्या आहेत. त्यापैकी एक तक्रार ही केंद्रीय अन्वेषण ब्युरो नवी दिल्ली, सीबीआय कडे आहे. तसेच २७९ कलमानुसार गणेश पगारे हे पादावरती एक न्यायप्रविष्ठ गुन्हा असल्यामुळे गणेश पगारेला त्या पदावरती ठेवण्यात येत नाही. गणेश पगार यांनी स्वतःच्या मुलाला व मुलीला अवैधरीत्या त्या ठिकाणी नोकरीला लावलेले आहे. तर बीड नगर परिषदेमध्ये स्वच्छता कर्मचारी म्हणून स्वतःच्या मुला मुलीला लावल्यामुळे गणेश पगारे अडचणीत येणार आहे. तर या ठिकाणी मात्र आता गणेश पगारे यांची बीड नगर परिषदेच्या लेखापाल पदावर उचल बांगडी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर बीड नगर परिषदेच्या अनेक भ्रष्टाचारांमध्ये गणेश पगारे सोबत मुख्याधिकारी नीता अंधारे ह्या देखील अडकणार आहेत. गणेश पगारे हा बीड नगर परिषदेमध्ये अवैधरित्या बसलेला लेखापाल आहे. लेखापाल गणेश पगारे यांनी राजकीय नेत्यांना हाताशी धरून घेतलेले पद आहे. त्यामुळे मुख्याधिकारी नीता अंधारे ह्या आता अडचणीत सापडणार आहेत. गणेश पगारेच्या अनेक तक्रारीचे अहवाल मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी दाबले व दडपून ठेवले आहेत. त्यामुळे नीता अंधारे ह्या अडचणीत येण्याची शक्यता आहे. गणेश पगारेला वाचविताना नीता अंधारे ह्या बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी पदावरून उचल बांगडी होणार हे आढळे आहे. कारण गणेश पगारे यांनी नीता अंधारे यांच्यावरती दबाव आणला आहे की, संबंधित केंद्रीय अन्वेषण नवी दिल्ली या प्रकरणी बीड नगर परिषदेतील कर्मचारी यांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत गणेश पगारेंच्या भोवती कारवाईचा फास आवळलेला आहे. तसेच लेखापाल गणेश पगारे हे कारवाईच्या रडारवर असल्याचे दिसून येत आहे.

> “ वरील संदर्भीय विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, श्री दिपक थोरात, संपादक सायं. दै. महाराष्ट्र आरंभ यांचे निवेदन दि. ०६.०३.२०२५ या कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर निवेदनात त्यांनी बीड नगर परिषद मधील सहाय्यक लेखापाल श्रेणी क गणेश तुळशीराम पगारे विरुध्द केंद्रीय अन्वेषण ब्युरो, नवि दिल्ली येथे चौकशी चालू आहे. तसेच उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे क्रिमीनल प्रकरण क्र थ.झ.छे. २६९/२०२३ प्रकरण चालू आहे. संबंधीत खात्याचे पत्र आपल्याकडे आलेले आहेत. आतापर्यंत गणेश तुळशीराम पगारे कडील पदभार का काढला नाही. गणेश तुळशीराम पगारे श्रेणी क लेखापाल नगर परिषद, बीड पदाचा तात्काळ पदभार काढून घेण्यात यावे, अशी नम्र विनंती केली आहे.

## दै.महाराष्ट्र आरंभने विचारलेल्या प्रश्नांवर मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी उत्तर द्यावे?

मुख्याधिकारी नीता अंधारे व लेखापाल गणेश पगारे यांच्या अनेक कारनामे तसेच केलेला कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार उघडकीस तसेच त्यावर वाचा फोडण्याचे काम दैनिक महाराष्ट्र आरंभ या वृत्तपत्राने केलेला आहे. तसेच मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी लेखापाल गणेश पगारे यांच्याबद्दल पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांवर बोलायला दुर्लक्ष का करत आहे? पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांवर उत्तर देण्यास त्या टाळाटाळ करत आहेत. तसेच दैनिक महाराष्ट्र आरंभने विचारलेल्या प्रश्नांवर मुख्याधिकारी नीता अंधारे बोलावे तसेच त्यावर उत्तर द्यावे? असे जाहीर आव्हान दैनिक महाराष्ट्र आरंभ करत आहे.

# बीड भाजी मार्केट येथील चौकाला लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब असे नाव द्यावे

## नामांतर केल्याने स्व.मेटे साहेबांच्या सेवाकार्याचे स्मरण होईल : गीतांजली देसाई

बीड । प्रतिनिधी

बीड शहराच्या मध्यवर्ती असणाऱ्या सुभाष रोड येथील भाजी मार्केट अंतर्गत असणाऱ्या चौकाला (सुभाष रोड, भाजी मंडई व राज हॉटेल कडे जाणारा रस्ता.) लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी शिवसंग्राम युवती आघाडीच्या जिल्हाप्रमुख सौ. गीतांजली देसाई यांनी निवेदनाद्वारे बीड नगरपालिका प्रशासनाकडे केली आहे.



बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांनी समाजकारण व राजकारन करताना सर्व समाजाला एकत्र घेत महाराष्ट्रभर समाज जोडण्याचे काम केले. बीड जिल्ह्याचे नाव सामाजिक कार्याने राज्यात गाजवत असताना सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणे, व्यसनमुक्त जिल्हा करण्यासाठी व्यसनमुक्ती कार्यक्रमांच्या माध्यमातून समाज जागृती करणे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील शिवस्मारक तसेच मराठा आरक्षणाच्या सोबतच धनगर व अल्पसंख्याक समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा ही स्व. मेटे साहेबांनी वेळोवेळी सभागृहात उठवला आहे.

बीड शहरातील विविध विकास कामांचा सोबतच शहराला जोडणाऱ्या बार्शी नाका पुल, कांकालेश्वर मंदिर, शहेशाहवली दर्गा येथील प्रस्तावित कामे सह अन्य विकास कामे करण्याचा प्रयत्न करत आलेले आहेत, लोकनेते स्व. मेटे साहेबांनी २५ वर्ष विधान परिषदेत सर्वसामान्य लोकांसाठी आवाज उठवत असतानाच अपघाताने दुर्दैवी निधन त्याच्या वाट्याला आल्याने बीड जिल्हा एका नेतृत्वाला मुकला आहे.

अश्या लोकनेत्याला आदरांजली म्हणून बीड शहरातील भाजी मार्केट येथील चौकाला लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी शिवसंग्राम युवती आघाडीच्या वतीने बीड नगर पालिका प्रशासनाला निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# शेळी मेंढी विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी बळीराम खटके यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

मेंढी विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी बळीराम खटके यांची निवड





करण्यात यावी अशी, मागणी दुर्गादेवी येथील धनगर समाजाचे युवा नेते आशोक गायकवाड यांनी युती सरकारकडे केली. धनगर समाज अत्यंत हलकीच जीवन जगणारा समाज असून महाराष्ट्र मध्ये दोन नंबरचा समाज आहे. व या समाजाला आर्थिक सामाजिक प्रवाहात आणण्यासाठी व समाजाला महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामा सर्वसामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी आदरणीय बळीराम तात्या खटके यांची निवड करण्यात यावी, व धनगर समाज न्याय मिळवून द्यावा. ही सरकारकडे विनंती करणारा आहोत.

आदरणीय भैया खटके यांनी धनगर समाजासाठी विविध आंदोलने मोर्चे काढले असून अनेक माध्यमातून त्यांनी समजण्यास मिळवण्यासाठी खूप तळमळीने मराठवाड्यामध्ये काम केले व समाजाला सामाजिक आर्थिक व शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केले. मराठवाड्यामध्ये त्यांची खूप मोठी ताकद असून त्यांना मानणार वर्ग मराठवाड्यात खूप मोठा आहे. बळीराम तात्या खटके यांना शेळी मेंढी विकास महामंडळ मध्ये नियुक्ती केल्यास धनगर समाज युती सरकारच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील व भविष्यात याचा फायदा महायुती सरकारला जिल्हा परिषद. पंचायत समिती. व ग्रामपंचायत. महानगरपालिका, नगरपालिकामध्ये मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. तसेच या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन होत आहे.

# महाराष्ट्रातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचा बायोमेट्रिक हजेरीला विरोध : डॉ तपसे

गेवराई । प्रतिनिधी

सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व वैद्यकीय अधिकारी हे नेहमीच आपल्या निर्णयाचा मनापासून स्वीकार करून आरोग्य सेवा देत आहेत. वैद्यकीय अधिकारी हे नेहमीच मुख्यालयी राहून दर्जेदार रुग्णसेवा पुरवत असतात. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहून २४ तास रुग्ण सेवा करणे बंधनकारक असल्याचा चुकीचा पायंडा प्रशासनात रुजला आहे. तरीही आजतागायत त्याची काटेकोरपणे वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून अंमलबजावणी सुरू आहे. पण शासन पातळीवर असा कोणताही निर्णय झाला नसल्याचे माहिती अधिकारात स्पष्ट झालेले आहे.

शासन नियमानुसार कोणताही कर्मचारी अथवा अधिकाऱ्याने आठ तास ड्युटी करणे बंधनकारक आहे. तसेच आठवड्याच्या सात दिवसांपैकी ४८ तास काम करणे आवश्यक आहे. हा नियम सरकारी, निम सरकारी, सहकारी अथवा खाजगी क्षेत्रातील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना लागू होतो. तरी सद्यस्थितीत बायोमेट्रिक प्रणालीवर हजेरी नोंदवणे बंधनकारक करण्याअगोदर खालील गोष्टींसाठी आपणाकडून योग्य ते मार्गदर्शन मिळावे ही विनंती.



वरील सर्व गोष्टी बघता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किती तास काम करावे?? रुग्णसेवेसाठी तसेच आपत्कालीन स्थितीमध्ये कामाचे तास किती व कसे??? विश्रांतीचा वेळ??? तसेच मुख्यालयी राहणे याबाबतचे म्हणजेच ज्या ठिकाणी शासकीय निवासाची व्यवस्था नाही अशा केंद्र व रुग्णालयापासून किती अंतरावर राहणे ?? तसेच ज्या ठिकाणी एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे त्यांनी बायोमेट्रिक प्रणाली द्वारे हजेरी कशी व केव्हा?? करावी.

सद्यस्थितीत बघता सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये सर्वच पदांची रिक्तता आहे. त्यामुळे आरोग्य सेवा देताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. या अगोदर सुद्धा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मूलभूत मागण्या वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवलेल्या आहेत. मुख्यालय वास्तव्य करत असताना अपुरे निवासस्थान, अपूर्ण मूलभूत सुविधा, अपुरे कर्मचारी व मनुष्यबळ तसेच मुख्यालय कोणत्या सुविधा वा कशा उपलब्ध आहेत अथवा नाहीत या सर्व गोष्टींचा आपल्या स्तरावरून विचार व्हावा. तसेच सद्यस्थितीत रिक्त असलेले ठिकाणी वैद्यकीय अधिकारी पद भरती करावी, त्यांचे कामाचे तास किती व कसे व मुख्यालय राहण्याची अट याबाबतचे सुस्पष्ट आदेश आपल्या स्तरावरून निर्गमित करून त्यानंतरच बायोमेट्रिक प्रणाली द्वारे हजेरी राबविण्यात यावी.ही विनंती कॅगमो संघटनेने केली आहे.

# चिंतेश्वराच्या कृपेने सिद्धेश्वराच्या दरबारात शिवपुराण

## मठाधिपती दिलीप बाबा यांच्या शुभहस्ते प्रारंभ!

गेवराई । प्रतिनिधी

शहरातील सावता नगर भागात श्री. भगवान चिंतेश्वराच्या कृपाशीर्वादाने व मठाधिपती दिलीप बाबा घोगे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार दि (२४) मार्च रोजी सकाळी सिद्धेश्वर मंदिरात महापूजा करून प्रारंभ करण्यात आला. समस्त सावता नगर मंडळी च्या सहकार्याने शिव मंदिर सिद्धेश्वर येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व शिवपुराण कथा सप्ताहाला पहील्यांदाच सुरुवात केली आहे. इथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सातत्य ठेवल्याने अखंडपणे सुरू असलेल्या राम कथा, अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा, सिद्धेश्वर कीर्तन महोत्सव, महाशिवपुराण असा प्रवास करत १२ वर्षाचा तप पूर्ण झाला असून महाशिवरात्री निमित्त भाविकांची दर्शनासाठी गर्दी होते दरवर्षी आषाढी एकादशीला महिला मंडळाकडून प्रसादाचे आयोजन करण्यात येत असतें तसेच महाशिवरात्री निमित्त भजनांचा कार्यक्रम होत असतो त्याच बरोबर महाशिवरात्री उपवास प्रसाद तसेच महाप्रसाद सुध्दा असयचा आणि भक्तगण मोठ्या मनोभावे इथे हजेरी लावतात. दररोज सायंकाळी हरिपाठ दर सोमवारी महाआरती करण्यात येते.



यंदा तेरावे वर्ष असून श्री.सिध्देश्वर सेवा समितीच्या माध्यमातून श्रीहरी रसाळ महाराज यांच्या मधुर वाणीतून श्री शिवमहापुराण कथेला प्रारंभ झाला असल्याने परिसरात भक्तमय वातावरण निर्माण झाले.

# श्री क्षेत्र दत्त संस्थानचे मठाधिपती श्रीहरी महाराज पवार यांना पितृशोक



बीड । प्रतिनिधी

कोल्हारवाडी फाटा, बार्शी रोड, बीड येथील श्री क्षेत्र दत्त संस्थानचे सर्वेसर्वा श्रीहरी महाराज पवार यांचे वडिल दत्तुबा पवार (आप्पा) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले मृत्युसमयी त्यांचे वय १०८ वर्ष होते.

दत्तोबा पवार यांनी दत्तभक्तांनच्या सुख:दुखासाठी आपली अवघी हयात खर्ची घातली. रविवारी सकाळी दत्त संस्थानच्या पाडुरंगाने अनंतात विलीन होणे पसंत केले आणि त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणारे दत्तभक्त व परिवार शोकसागरात बुडून गेला. त्यांचे निधन परिवारासाठीच नव्हे, तर दत्तभक्तांनसाठीही कधीही भरून न येणारी हानी आहे. अंत्यसंस्कारासाठी जमलेला समुदाय आप्पांच्या मनाची श्रीमंती सिध्द करत होता; राजकीय, सामाजिक, वारकरी व सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यसंस्कारासाठी उपस्थित लावली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# शेख शाफिया चा पहिला रोजा पूर्ण

बीड । प्रतिनिधी



शहरातील शेख शाफिया फताउद्दीन (सिराज) हिने वयाच्या अकराव्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. यानिमित्ताने तिचे अभिनंदन होत असून यापुढेही तिने असेच दरवर्षी रमजान महिन्याचे पूर्ण रोजे ठेवावे अशा शुभेच्छा देऊन सदिच्छा व्यक्त केल्या जात आहे.

शाफीयाने प्रथमच रमज़ान महिन्याचा रोजा पूर्ण केल्याने तिचे दादा-दादी, अब्बू-अम्मी, फुप्पू-फुप्पा, शेख शारिक भैय्या आणि सर्व बहिण-भावंडांनीही अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

# गंगादेवी विद्यालय येथे प्रा.अनिल होळकर यांचा सेवा गौरव सोहळ्याचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील गंगादेवी विद्यालय गंगादेवी तालुका आष्टी जिल्हा बीड येथील प्राचार्य श्री अनिल देवीदास होळकर यांचा सेवा गौरव सोहळा मंगळवार दिनांक २५ /३/ २०२५ रोजी सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आला आहे. होळकर सरांचा स्वभाव मनमिळावू व सतत गावातील लोकांबरोबर सलोख्याचे संबंध व हसतमुख चेहरा अशा मनमिळावु प्राचार्यांचा सेवा गौरव सोहळा मंगळवारी संपन्न होणार आहे. या सेवा गौरव सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ॲड. हनुमंतराव थोरवे (सचिव लोकमान्य शिक्षण संस्था कुंटेफळ) हे अध्यक्ष स्थानी असणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्धवरावजी धमाळ महाराज (चितळे पाडळी), विठ्ठलराव नागरगोजे (सरपंच गंगादेवी), दादासाहेब चितळे सर (अध्यक्ष मच्छिंद्रनाथ संस्था सावरगाव) सह शैक्षणिक सामाजिक, क्षेत्रातील मान्यवर या सेवा गौरव सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.



# सलोख्याचा वाहक, मैत्रीचा नायक लोकपत्रकार एक लोकआवाज



माझं गाव तलवाडा त्यांचं अन माझ्या गावच एक नातं आहे ह टिपू सुलतान जयंती म्हणजे तावरे साहेबांच भाषण माझ्या गावच आंदोलन असलं कि त्यांचा सहभाग आलाच. बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र नाळवडी येथील रहिवासी असलेल्या लोक पत्रकार भागवत तावरे यांनी आपल्या लिखाणातून आपली स्वतःची ओळख निर्माण करून घेतली गरीब कुटुंबातील जन्म घेतलेल्या लोक पत्रकार यांनी लहान पनांपासून स्व धर्म सहभाव घेतलेला वसा पुढे चालवत आहेत प्रत्येक समाजात वावरताना कोणत्याही समाजात तेढ निर्माण होईल कधीच चुकीचे वागत नाही प्रत्येक समाजातील माणसासोबत आपल्या लहान भावा सारखे व मोठे भावासारखे वागणारे व मनमिळाऊ व्यक्तिमत्व अनेकांचे गोरगरिबांच्या सुख दुःखात एक कॉलवर धाऊन येणारे कोणत्याही समाजाचा विषय असो त्यांना कॉल केल्यावर प्रश्न सॉल केल्याशिवाय मागे माघार नाही घेणारे हे प्रश्न कोणताही कठीण असले तरी शेवटपर्यंत सत्याची बाजू म्हणून ते पुढाऱ्यांच्या कसला विषय असो किंवा प्रशासनाचा विषय असो त्यांना न्याय मिळवून देणारे कोणत्याही परिस्थितीत माघार नाही येणारे भागवत तावरे सर म्हणजे एक आणि अडचणी एक कॉलवर धावून येऊन आपले प्रश्न सोडून देणारे व्यक्तिमत्व आहे मी आज भागवत तावरे सर सोबत अनेक वर्षापासून सहवास केला आहे त्यांना मी जवळून पाहिले आहे तावरे सरांना कोणत्याही प्रश्नावर काही आपलं काम पडले तर त्यांना आपण फोन केला तर बोला आलताफ भाई काय अडचण आहे.

समाजात किंवा जीवनातील प्रवासात अनेक लोक पाहिले आहेत की गरीबाला कधी गरज पडली तर कोणी समोर येत नाही परंतु लोकपत्रकार भागवत तावरे यांना मी कोरानाच्या काळात सुद्धा रात्रीचे तीन वाजता दोन वाजता फोन केले तर त्यांनी अनेक गोरगरिबांना मदत केलेली प्रत्यक्ष मी अनुभवले आहे. आजही भागवत तावरे म्हणजे एक उगवता तारा आहे सत्य काम करत असताना अनेक अडीअडचणी ला तावरे सरांना समोर जावे लागले आहे. आज एक छोटे खेडेगावातून नाळवंडी यासारख्या गावातून येऊन बीड जिल्ह्यात त्यांनी प्रत्येक समाजातील युवकांच्या मनावर आपली प्रेमाची थाप पसरलेली चित्र पहावयास मिळत आहे भागवत तावरे म्हणजे एक मित्र नाही तर भावा समान सर्व समाजात वागणारा एक मोठा भाऊ मानला जात आहे.

शेतकरी कुटुंबात जन्म झालेले तावरे नेहमी शेतकऱ्यांची बाजू मांडतात सत्तेशी भांडतात. मुस्लिम भावना जपताना त्यांना कितीतरी त्रास झाला. गोरगरिबांच्या मदतीला सदैव धावून येणारे आपल्या लिखाणातून न्याय मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर असणारे ज्ञानाच्या माध्यमातून विचाराची ज्योत पेटवणारे जो झुकला ना कधी, थकला ना कधी, ना मानली कधी कुणासमोर हार. लेखणीतून त्याने दिले उत्तर सर्वांना शस्त्राची याच आपल्या वाढवून धार जपली ज्याने अखंड माणूसकी अन् माणसांमधील प्रत्येक अवतार.. समाजसेवेचा घेतलेला वसा जपताना ना घेतली कधी या पठ्ठ्याने माघार. माणसामधील माणूस जपताना ना पाहीला कधी ज्याने जात-धर्म, ना बघितले इनासानियत ज्याच्या नजरेत आहे. सदा-सर्वदा श्रेष्ठ फक्त आणि फक्त माणसाचे कर्म आहे. लोकपत्रकार भागवत तावरे सर आपणास वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा.

**शब्द संकलन**
**पत्रकार आल्ताफ कुरेशी तलवाडा**
**९७६७६७८०३१**

# बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था चाळणी झालेल्या रस्त्यांवर अजितदादा अवतरले

बीड । प्रतिनिधी

बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था झाली असुन ठिकठिकाणी पडलेले जीवघेणे खड्डे, वाळुमिश्रित खडीचा धुराळा उडत असुन अपघातांची संख्या वाढली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे बीड शहरातील ११० कोटी रुपयांच्या ४० फुट रूंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाकडे वर्षभरापूर्वी पाठविण्यात आलेला प्रस्ताव लालफितीत अडकला असुन त्यास तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा या प्रमुख मागणीसह धुळे ते सोलापूर रस्त्यावरील खड्डे कायमस्वरूपी बुजवुन रखडलेले दुभाजकांचे काम पूर्ण करून साईडपंखे भरण्यात यावेत. बीड ते अहिल्यानगर मार्गाचे काम संथगतीने होत असुन प्रमुख शासकीय कार्यालये असणाऱ्या रस्त्यांवर गर्दी होत असुन जलदगतीने पुर्ण करण्यात यावे या मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२४ सोमवार रोजी वाजता कारंजा टॉवर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरपरिषद बीड कार्यालय अजितदादा पवार यांचे मुखवटे घालून चाळण झालेल्या रस्त्याची पाहणी करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, मुबीन शेख, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले आदी सहभागी होते. मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.

## मुखवटे घालून लक्ष्यवेधी आंदोलन : गणेश ढवळे

बीडमधील १७ मुख्य रस्ते मंजुरीचा प्रस्ताव लालफितीत अडकला असुन त्यांना मंजुरी देऊन निधी देण्यात यावा. बीड नगर पालिकेने एक वर्षापूर्वी बीड शहरातील ११० कोटी रूपयांच्या ४० फुट रूंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठवलेला प्रस्ताव लालफीतीत अडकला आहे. शहरातील नगर रोड ते पालवण चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते संतोषीमाता मंदिर, राजुरी वेस – बलभीम चौक –माळीवेस , बलभीम चौक ते दगडी पुल,थिगळे कॉम्प्लेक्स ते जालना रोड, जिजामाता चौक ते मसरतनगर अशा एकुण शहरातील १७ अत्यंत महत्त्वाच्या प्रमुख रस्त्यांचा प्रस्ताव वर्षभरापूर्वी बीड नगरपालिकेने नगर विकास विभागाकडे पाठविला आहे.१७ रस्ते ४० फुट रूंदीचे होणार असुन त्यासाठी ११० कोटी रुपये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत होणार आहेत. बीड शहरातील रस्त्यांची दुरावस्था झाली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे.शहरात वर्दळीचा असलेला छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज ते कारंजा टावर या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असुन वाळु मिश्रित खडीचा धुरळा उडत आहे. वाहनांचे अपघात होत आहेत. त्यामुळे तातडीने प्रस्ताव मंजूर करून रस्त्यांसाठी निधी देण्यात यावा.




### धुळे ते सोलापूर शहरांतर्गत रस्त्यांवरील खड्डे बुजवून दुभाजकांचे अर्धवट काम पूर्ण करून साईडपंखे भरण्यात यावेत

शहरातील धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बार्शी नाका ते राष्ट्रवादी भवन पर्यंत मागील अनेक वर्षापासून मोठमोठे जीवघेणे खड्डे पडले असुन या खड्ड्यात वाहने आदळुन अपघातात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर या मार्गावरील जालना रोड वरील दुभाजकांचे काम अर्धवट असुन दुभाजकांसाठी जागा सोडण्यात आली असुन त्याठिकाणी माती टाकण्यात आली आहे.त्यामुळे रस्ता ओलांडताना वाहनांची चाके फसुन अपघाताच्या घटना घडत आहेत.तर दुसरीकडे महामार्गावरील मुख्य सिमेंट रस्त्याच्या बाजुचे साईडपंखे भरण्यात आले नसुन दुचाकी वाहनचालकांचे घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत.

### बीड ते अहिल्यानगर महामार्गाचे बीड शहरातील काम संथगतीने असुन जलदगतीने पुर्ण करण्यात यावे

बीड शहरातील मुख्य रस्ता असलेल्या बीड ते अहिल्यानगर रस्त्याची दुरावस्था झाली आहे. अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केल्यानंतर या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. मात्र काम करणाऱ्या ठेकेदार यंत्रणेने नियोजन शून्य काम केल्याने दीड वर्ष लोटूनही शहरातील दोन किलोमीटर अंतराचा रस्ता अद्याप पूर्ण झालेला नाही. बालेपीर पासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत रस्ता पूर्ण झाला असला तरी काही भागातील खड्डे, रस्त्यांचे जोड कायमच आहेत. या ठिकाणी खडी, धुराळा उडून वाहन चालकांना त्रास होतो. या रस्त्यावर जिल्हा न्यायालय, समाज कल्याण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, बांधकाम विभागाचे कार्यालय, मुख्य प्रशासकीय इमारत अशी ६६ शासकीय कार्यालय असल्याने दुचाकीची वाहतूक मोठी आहे. त्यामुळे कायम गर्दी असते त्यामुळे संथगतीने चालणारे रसत्याचे काम जलदगतीने पुर्ण करण्यात यावे.

# संगीत साधना मंचची संगीत सभा उत्साहात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संगीत साधना मंचच्या वतीने मराठवाड्यातील गायिका सध्या पुणे स्थित स्वरेशा पोरे (कुलकर्णी) यांची गायन सभा रविवारी उत्साहात संपन्न झाली. दुसऱ्या प्रहरात संपन्न झालेल्या समय चक्रा नुसार राग ऐकण्याची या सभेत सुरुवातीला स्वरेशा पोरे यांनी सकाळच्या दुसऱ्या प्रहरातील राग नटभैरव विलंबित एकतालातील, समझत नही या बंदिशीने आपल्या गायनाची सुरुवात केली. यानंतर नाचत नटराज या द्रुत तीन तालातील बंदीशीने रसिकांची मने वेधून घेतली.




यानंतर स्वरेशा पोरे यांनी पंडित सी.आर. व्यास रचित राग बिलासखानी तोडी मधील त्यज रे अभिमान, जान गुनियन सो' ही सर्व परिचय बंदिश सादर केली. यानंतर द्रुत एकतलातील जागत तोरे कारण बलमा अनोखी बंदी सादर केली या बंदीची वैशिष्ट्य म्हणजे, अस्थाई एक तालाच्या वजनाने जात होती आणि अंतरा मात्र तिनतालाच्या वजनाने जाऊन परत एकदा एक तालाच्या वजनाला भिडत होता. ही तालाची समज, रसिकांना सौ.स्वरेशा पोरे यांनी समजावून सांगितली आणि लिलाया करूनही दाखवली. यानंतर प्राणेश पोरे रचित गिनत हारे' या अर्थपूर्ण आणि अप्रतिम बंदिशीने, समस्त रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. यानंतर समर्थ रामदास रचित तानी स्वर रंगवावा 'या अभंगाने संगीत सभेची सांगता झाली. संवादिनीवर विश्वजीत धाट तर तबल्यावर रत्नदीप शिगे यांनी साथसंगत केली. सभेच्या रंजकतेचा चढता आलेख उपस्थित रसिकांनी अनुभवला.

# ऐतिहासिक कारंजा टॉवर कात टाकू लागले



बीड । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षांपासून परिपूर्ण नूतनीकरणाच्या प्रतीक्षेत असलेल्या तसेच बीड शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर ची गेल्या काही दिवसात परिपूर्णतेकडे वाटचाल सुरू आहे. यामुळे केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे ही म्हण पुन्हा एकदा सिद्ध होत आहे.

सन २०१४ सालापासून ऐतिहासिक कारंजा टॉवरचे परिपूर्ण नूतनीकरण रखडलेले आहे. यामुळे कारंजा टॉवर ची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या ऐतिहासिक वास्तूची गरिमा आणि गौरव अबाधित राहावे, ही वास्तू परिपूर्ण व्हावी म्हणून १४ फेब्रुवारी २०२५ रोजी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, पोलीस अधीक्षक आणि तहसीलदार यांना निवेदन देऊन कारंजा टॉवर चे नूतनीकरण परिपूर्ण करावे अशी मागणी केली आहे.

यानंतर तालेब पटेल आणि मिर्झा अब्दुल रऊफ बेग यांनीही प्रशासनाकडे निवेदन देऊन हीच मागणी लावून धरली. या दोन्ही बाबी प्रसिद्धी माध्यमातून समाजाच्या पटलावर आल्याने नागरिकांमध्ये कारंजा टॉवर विषयी जागरूकता निर्माण झाली. आणि कारंजा टॉवर लगत सिमेंटचे १० बाकडे ठेवण्यात आले. आता या बाकड्यांवर सकाळ, संध्याकाळ आणि रात्री आबालवृद्ध बसून आनंद घेत आहे. टॉवर समोर डिजिटल बॅनर लावणे आणि कचरा टाकण्यावर प्रतिबंध लावण्यात आला आहे. आज दिनांक २४ मार्च २०२५ सोमवार रोजी कारंजा टॉवर समोर बनविलेल्या हौदात पाण्याचे फवारे उडविणारी मोटर लावण्यात आली आहे. हे कार्य कारंजा टॉवरच्या परिपूर्णतेसाठी दक्ष असलेले तरुण तडफदार मिर्झा अब्दुल रऊफ बेग यांच्या देखरेखीखाली करण्यात आले.

आता लवकरच पाईप लाईन मध्ये नवीन नोझल आणि रंगबिरंगी लाइट्स लावून टॉवर समोरील पाण्याचे फवारे सुरू करण्यात येणार आहे. असे असले तरी जिल्हा प्रशासनासह बीड नगर परिषद प्रशासन अजूनही ऐतिहासिक कारंजा टॉवर बद्दल ढिम्मच आहे. प्रशासनिक स्तरावर अजूनही दखल घेतली जात नाहीये. यामुळे जनतेतून नाराजी व्यक्त होऊ लागली आहे. म्हणून ऐतिहासिक कारंजा टॉवरला परिपूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनासह बीड नगर परिषद प्रशासनाला बाध्य करेपर्यंत स्वस्थ बसणार नाही असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ आणि रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.

# यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन

परळी वैजनाथ / दिंद्रुड । प्रतिनिधी

कै.रामभाऊ आण्णा खाडे संस्थेच्या संगम फाटा दिंद्रुड येथील यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार दि. २९ एप्रिल रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले असुन या संमेलनास पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संचालक विलास खाडे व यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक वृंद यांनी केले.



यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलनाचे शनिवार दि.२९ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून बीड चे सिव्हिल सर्जन डॉ. अशोक थोरात तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव तथा कै.रामभाऊ आण्णा खाडे संस्थेचे अध्यक्ष प्रदिप खाडे व प्रमुख उपस्थितीत अबाजोगाईचे प्रचार्य विक्रम सारक, उद्योजक सुरेश नाना फड, दिंद्रुड पो.स्टे.चे एपीआय खोडेवाड, विनायक कन्स्ट्रक्शन, अंबाजोगाचे मनोज गीते, डी.बी. क्षीरसागर (सहाय्यक संचालक), श्री. दादासाहेब मुंडे (सामाजिक कार्यकर्ते), लक्ष्मण बारगजे (जिल्हा निरीक्षक) हे उपस्थितीत राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रदीप रोडे (संस्थापक प्रा. देवगिरी प्रतिष्ठान, बीड), साहेबराव बडे (अध्यक्ष लोकशाही विद्यालय), श्री. शिवाजीराव चाटे (प्रा. यशवंतराव चाटे शिक्षण संस्था, कैज), श्री. राजाभाऊ चाटे (प्रा. राजवैभव सेवाभावी संस्था, केज), जनकराव उबाळे (पूर्व जनकल्याण सेवाभावी संस्था, सिरसाळा), अजय चाटे (गजानन विद्यालय प्रसारक मंडळ केज), अनंत धुमाळ (प्री गुरुकुल पब्लिक स्कूल. तेलगाव), बाळासाहेब राठोड (कृष्णकेसरी सेवाभावी संस्था धारूर), सचिन सानप (गणेशानंद शिक्षण संस्था) आदींची उपस्थिती लाभणार आहे.

दरम्यान वार्षिक स्नेहसंमेलन या कार्यक्रमास शिक्षणप्रेमी नागरिक, विद्यार्थी व पालक तसेच नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आपल्या स्कुलचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला. तरी आपण सह–कुटुंब सहपरिवार उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी व विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी व मान्यवरांचे प्रेरणादायी मार्गदर्शन ऐकण्यासाठी आपण आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन संचालक विलास खाडे व यश इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य व शिक्षक वृंद यांनी केले.




तालुक्यातील पाटण सांगवी येथील शेतकरी कुटुंबातील मुलगा आदित्य अशोक खिलारे यांची इंडियन आर्मी मध्ये निवड झाल्याबद्दल या तरुणाचा पाटण सांगवी येथे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शत्रुघन बापू मरकड (माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती कडा) गावचे सरपंच दत्तात्रेय आबा खोटे सह प्रमुख मान्यवर गावकरी उपस्थित होते. (छायाचित्र सुरेश कांबळे आष्टी)

# बीड जिल्हा डिजिटल मिडिया परिषदेच्या सदस्य नोंदणीस प्रारंभ : जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे

गेवराई । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेचे सदस्य नोंदणी अभियान राज्यभरात राबविले जात आहे. आपल्या जिल्ह्यातही या सदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ केला जात असून बीड जिल्ह्यातील सर्व यु ट्यूब चॅनल व पोर्टलचे संपादक आणि पत्रकार यांनी यात सहभाग घेऊन आपली सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मिडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.

महाराष्ट्र राज्यातील बीड, सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, परभणी, बुलढाणा, रत्नागिरी, पुणे, सिंधुदुर्ग, गडचिरोली, लातूर, नांदेड, रायगड, आहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगरसह इतर जिल्ह्यात मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार तसेच विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांच्या मार्गदर्शनाखाली व डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या सुचनेनुसार त्याच बरोबर राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे, राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर, प्रदेश सदस्य अनिल धुपदळे, तानाजी जाधव, जितेंद्र सिरसाठ, अफताब शेख यांच्या सहकार्याने हे सदस्य नोंदणी अभियान युद्धपातळीवर राबविले जात आहे. त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातही सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात केली जाणार आहे.



आपल्या बीड जिल्ह्यातील सर्व यु ट्यूब चॅनल चे तसेच पोर्टल चे संपादक, उपसंपादक, पत्रकार यांनी या सदस्य नोंदणी अभियानात सहभागी होऊन आपली नोंदणी करावी. भविष्यात मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली व डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली यु ट्यूब चॅनलचे व पोर्टलच्या विविध प्रश्नांसाठी लढा उभारण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे आपल्याला सदस्य नोंदणी फार्म भरणे आवश्यक आहे. या सदस्य नोंदणी अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहनही डिजिटल मिडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे.

# राक्षसभुवन येथील गोदावरी नदी कोरडी ठाक

## दशक्रिया विधी विकतच्या पाण्यावर; नागरिकांची हेळसांड?

गेवराई | प्रतिनिधी

तालुक्यातील राक्षसभुवन येथील गोदावरी नदीचे पात्र दोन महिन्यापासून कोरडेठाक पडल्याने दशक्रीया विधी विकतच्या पाण्यावर करावे लागत आहेत.त्यातच शनी अमावस्येचा योग जुळून आल्याने शनी भक्तांचे पाण्याअभावी हाल होणार असून, भाविकांची गैरसोय लक्षात घेता गोदावरी नदीच्या पात्रात पाणी सोडण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

राक्षसभुवन (ता.गेवराई जि.बीड)गोदावरी नदीच्या काठावर शनिचे साडेतीन पिठा पैकी एक मुख्य पिठ आहे. राज्यातील विविध भागातील भक्त दर्शनास येतात. रोजच या ठिकाणी भक्त दर्शनास गर्दी करत असतात.



शनी व सोमवती अमावस्येला लाखो भाविकांची शनीच्या दर्शनास मांदियाळी होत असते. दुरदुरवरुन आलेले भाविक गोदावरीच्या पात्रात डुबकी मारून दर्शन करतात. मात्र, मागील दोन महिन्यापासून राक्षसभुवन येथील गोदावरीचे पात्र कोरडेठाक पडल्याने दररोज होत असलेले दशक्रीया विधी पाचशे ते एक हजार रुपये देऊन विकतच्या पाण्यावर करावे लागत आहेत. येत्या २९ मार्चला शनी अमावस्या आल्याने शनीच्या गोदावरी नदीचे पात्र कोरडेठाक पडल्याने येणाऱ्या भाविकांची परवड होण्याची शक्यता असून, गोदावरी नदीच्या पात्रात पाणी सोडण्यात यावे अशी मागणी शनी संस्थान तसेच नागरिकांकडून होत आहे.

### रोजच होतात पन्नास ते साठ दशक्रीया विधी

राक्षसभुवनच्या तीर्थक्षेत्र ठिकाणी दुरदुरचे रोज दशक्रीया विधी मोठ्या प्रमाणावर होत आहेत. मात्र, दोन महिन्यापासून गोदावरीचे पात्र कोरडेठाक पडल्याने सद्यपरिस्थितीत विकतच्या पाण्यावर दशक्रीया विधी करण्याची वेळ आलेली आहे. यामुळेच नागरीकांची परवड होत असून, येत्या शनी अमावस्यानिमित्त येणाऱ्या भाविकांची गैरसोय दुर करण्यासाठी नदी पात्रात पाणी सोडण्यात यावे अशी मागणी शनी संस्थानचे अध्यक्ष संतोष काठवटे यांनी केली आहे.



# सूर्याच्यावाडी च्या लाल मातीने मर्दागी कुस्तीची परंपरा जोपासली : राजेंद्र मस्के

बीड | प्रतिनिधी

सूर्याचीवाडी ता.बीड येथे पिरबाबा दर्ग्याच्या यात्रेच्या निमित्ताने जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सूर्याचीवाडी येथील व परिसरातील हजारो नागरिक उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये राज्यभरातून कुस्तीतील नामवंत पैलवान यांनी भाग घेतला होता, सूर्याचीवाडी हे गाव लोकसंख्येने कमी असले तरी महाराष्ट्रातील कुस्ती हा पारंपारिक व ग्रामीण खेळ जोपासण्याचे काम सूर्याची वाडी येथील ग्रामस्थांनी केले आहे.

अतिशय उत्कृष्ट असे नियोजन व मोठ्या प्रमाणामध्ये कुस्तीतील भाग घेतलेल्या पैलवानांना बक्षीस देण्यात आले, कुस्ती हा खेळ लाल मातीत खेळला जातो ही लाल मातीतील कुस्तीची दंगल ग्रामीण भागातील नागरिकांना प्रेरणा देणारी असते, हा खेळ मर्दानी खेळ म्हणून या खेळाची ओळख आहे.

एकास एक मल्य पैलवान हे आपले ताकदीच्या जीवावर व एकजुटीच्या जीवावर आपलं सर्वस्य पनाला लावून आपण या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस कसे पटकवतोल असे प्रयत्न करत असतात, म्हणूनच लाल मातीतील या कुस्तीला मर्दानी खेळ असे ओळख निर्माण झाली आहे, असे मत राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले आहे. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक सह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केस मिटवण्यासाठी ८० वर्षीय वयोवृद्ध शिक्षकास धमक्या व खोटा गुन्हा दाखल करत दबाव टाकण्याचा प्रयत्न

अंबाजोगाई | प्रतिनिधी

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय आडस या संस्थेत ४१ वर्षे सेवा करून आपल्या कार्याचा सर्वसामान्य वर ठसा उमटवणारे आंबेडकरवादी दलित चळवळीचे कट्टर समर्थक माणुसकी ही जात व मानवता हा धर्म असे अनेक व्याख्याते देऊन समाज प्रबोधन करणारे एक गाव एक पाणवठा कार्यक्रम ग्रामीण भागात राबविणारे विद्यार्थी प्रिय शिक्षक व कै. बाबुराव आडसकर यांचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांचा आडस व ग्रामीण परिसरात नावलौकिक आहे ते सोनवळा गावचे माजी सरपंच विठ्ठलराव साहेबराव देशमुख गुरुजी वय वर्ष ८० यांच्यावर कट रचून प्रदीप पतंगे यांनी खोटा गुन्हा नोंदवला आहे जो मुळीच झालेला नाही चंद्रकांत पतंगे व त्याचे दोन मुले प्रदीप पतंगे व विठ्ठल पतंगे यांच्यावर धारूर कोर्टात केस चालू आहे त्यांनी गुरुजींचा मुलगा गोकुळ देशमुख यांचे डोके फोडून जीवे मारण्याच्या उद्देशाने गंभीर रित्या जखमी केले होते.

यावेळी गुरुजींनी स्वतःच्या मुलाला समजावून सांगून भांडण न करता आपण कायद्यानेच लढू अशी विनंती केली की केस बोर्डावर आल्यामुळे वरील आरोपी गुन्हेगारी व गुंड प्रवृत्तीचे असल्यामुळे विठ्ठलराव देशमुख गोकुळ देशमुख यांना सातत्याने केस विड्रॉल करा अन्यथा तुमचे पाय तोडू खून करू अशा धमक्या सातत्याने देत आहेत केस मिटवण्यासाठी वाटेल ते प्रयत्न चंद्रकांत पतंगे विठ्ठल पतंगे प्रदीप पतंगे हे करत आहेत याच उद्देशाने दबाव तंत्र टाकण्यासाठी विठ्ठलराव देशमुख गोकुळराव देशमुख व अविनाश देशमुख यांच्यावर प्रदीप पतंगे यांने जो गुन्हा झालेलाच नाही तो खोटा गुन्हा दाखल केला आहे.

वरील तिघां व पतंगे चेही लोकेशन शोधले असता सत्य परिस्थिती समजून पतंगे सातत्याने दबाव टाकत खोटे गुन्हे दाखल करत असल्याने ८० वर्षाचे वयोवृद्ध शिक्षक विठ्ठलराव साहेबराव देशमुख यांना मानसिक त्रास होत आहे या वर व खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या वर पोलीस प्रशासन कारवाई करेल का हा प्रश्न आहे नाहीतर तपासात आंधळ दळत आणि कुत्र पीठ खात असं होऊ नये.

# दीड महिन्यांपासून न दिलेली माहिती आठ दिवसात गटशिक्षणाधिकारी देणार का?

किल्ले धारूर | प्रतिनिधी

येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय हे सतत चर्चेत असते त्यात आवरगाव येथील संदीप अनंतराव पांचाळ यांनी गेल्या दीड महिन्या पूर्वी समग्र शिक्षा अभियान, व अन्य २०११ पासून ते आज पर्यंत माहिती मिळवण्यासाठी गटविकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांना माहिती च्या मागणीसाठी रीतसर अर्ज देण्यात आला होते परंतु त्यांनी आजपर्यंत ही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे गट विकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांच्याकडे संदीप पांचाळ यांनी प्रथम आपील केल्याने त्यांनी दि. २० मार्च रोजी प्रथम सुनावणी पंचायत समिती धारूर येथे ठेवण्यात आली होती परंतु या सुनावणीसाठी माहितीचे प्रतिनिधी म्हणून आय इ साधन व्यक्ती श्री मदने डी एन हे उपस्थित होते.

अपिलार्थी या सुनावणीच्या वेळी उपस्थित होते, यात कोणतीही माहिती दिलेली नाही त्या नंतर गटविकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांनी गटशिक्षणाधिकारी धारूर यांना आठ दिवसात माहिती देण्यात यावी असे सुनावले आहे व माहिती न दिल्यास पुढील अपील करतील असे पत्र गटशिक्षण अधिकारी यांना गटविकास अधिकारी यांनी दिले आहे.

# वेलतुरी येथे बिबट्याने केली शेळी फस्त

## गंगादेवी वेलतुरी अरणविहरा परिसरात बिबट्याचा मुक्त संचार

आष्टी | प्रतिनिधी

तालुक्यातील गंगादेवी अरणविरा वेलतुरी येथे सध्या बिबट्याचा मुक्त संचार पाहवयास मिळत आहे. त्यामुळे शेतकरी भयभीत झाले असून बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.




सविस्तर वृत्ताची वेल तुरी येथील हरिभाऊ अण्णा गव्हाणे हे शेतकरी शेळ्या चारण्यासाठी साठी शेतात जात असतात संध्याकाळच्या वेळेस शेळ्या घेऊन घराकडे येत असताना येईल तरी गावच्या जुन्या पुलाजवळ त्यांच्या शेळी वर बिबट्याने हल्ला चढवला. या शेळीचा मृत्यू झाला. या शेतकऱ्यांची आतापर्यंत बिबट्याच्या आल्यात ४ थी शेळी मृत्युमुखी पडली आहे.

या बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी शेतात जाताना घाबरतात दोन–तीन दिवसांपूर्वी अरणविहरा येतील श्वानावर हल्ला करत त्याचे डोक्याला पकडून ओढत नेले होते तरी काही महिन्यापूर्वी सावरगाव येथील शेतकऱ्यांच्या जांभूळ डोह येथे बिबट्याने शेळी फस्त होती तरी वनविभागाने या बिबट्याचा जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावावा असे मागणी वेल तुरी येथील सरपंच नवनाथ गव्हाणे, विठोबा गव्हाणे, उपसरपंच सुनीता गव्हाणे, भानुदास गायकवाड, साईनाथ गव्हाणे, समाजसेवक आबा गव्हाणे व गावकऱ्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# माझा लाडका मेहुणा बाबासाहेब डोंगरे काळाच्या पडद्याआड

बीड | प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर आणि लोकशाहीवर प्रचंड विश्वास असलेल्या बीड जिल्ह्यातील कोठरबन येथील कालवश बाबासाहेब सुखदेव डोंगरे यांनी काही कालावधीत काळेवाडी पुणे येथे पल्बरचा व्यवसाय सुरू केला आणि त्यांच्या कामाने लोक पाहिल्याचं भेटीत आपल्या कायम लक्षात राहतात असेच एक व्यक्तिमत्व म्हणजे बाबासाहेब डोंगरे होते. पल्बर उद्योगाचे ठेकेदार झाले व त्यांना डोंगरे शेठ म्हणून टोपणनावाने प्रसिद्ध असलेल्या आणि पंधरा वर्ष आपल्या कामाने लोकांना वेड लावले व कितीही अवघड काम काही क्षणात करणारे बाबासाहेब डोंगरे अचानक जगाचा निरोप घेतला आहे. ते पंधरा दिवसा पुर्वी रविवारचा असल्याने दोन मजली इमारतीवर काम करत असताना एका पत्र्याच्या शेडवर पाय पडला आणि खुब्यामध्ये फॅक्चर झाले व त्यांचे आपरेशन देखील चांगले झाले परंतु दि १८.०३.२०२५ रोजी पहाटे ०५:०० वाजता त्यांच्यावर उपचार सुरू असताना उपचारादरम्यान सकाळी पहाटे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला आहे. त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती कळताच त्यांच्या जन्म गाव कोठरबन, वडवणी, बीड जिल्ह्यात व काळेवाडी पुणे सह हळहळ व्यक्त केल्या जात आहे. काळेवाडी,पिंपरी चिंचवड पुणे येथे राहणारे बाबासाहेब डोंगरे हे कोणालाही कधीही कुठं भेटले की चेहऱ्यावर कायम हास्य स्मित बोलायचे असे माझे लाडके मेहुणे आम्हाला अचानक सोडून गेल्याने मी व माझे कुटुंबीय, आणि त्यांची आई, पत्नी, मुलगा, मुलगी, बहिणी, भाऊ, भाच्चे, भाच्या, पुतणे, पुतण्या, सह मित्र परिवार पोरका झाला आहे.




# पाच वर्षात गेवराई विधानसभा मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार

## आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते निपाणी जवळचा येथे विकासकामांचा शुभारंभ

गेवराई | प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी विकास कामांचा धडाका सुरू केला असून आज निपाणी जवळका येथे ग्रामपंचायत भवन सभामंडप व पंधराव्या वित्त अयोगातुन पाण्याची टाकी उभारणी या विविध विकास कामांचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. आपण मला विधानसभेत काम करण्याची संधी दिली असून त्या बळावरचयेणाऱ्या पाच वर्षांत गेवराई विधानसभा मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील निपाणी जवळका येथे आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते विवीध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये ग्रामपंचायत भवन सभामंडप व पंधराव्या वित्त अयोगातुन पाण्याची टाकी या कामाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला. याप्रसंगी पंचमुखेश्वर संस्थान भाटेपुरीचे महंत महादेव महाराज श्रावणपुरी, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण संचालक



जगन्नाथ शिंदे, श्रीराम आरगडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, निपाणी जवळक्याचे ग्राम दैवत श्री ज्योतीबारायांच्या यात्रे साठी या गावामध्ये मी गेले कित्येक वर्षापासून येत आहे. यात्रे मध्ये बारा गाड्या ओढण्याचा मान मला दिला जातो हे मी कदापीही विसरणार नाही. येणा–या काळामध्ये निपाणी जवळका येथील मारुती मंदिर सभामंडप, श्री ज्योतीबारायांच्या मंदिराकडे जाणारा रस्ता, दलीत समाजासाठी स्मशानभूमी व औरंगपुर तांड्यावरील स्मशानभूमीचे बांधकाम केले जाईल. निपाणी जवळका ह्या गावाचे शिवछत्र परीवारा समवेत कायम जिव्हाळ्याचे संबंध आहेत. विकासकामे दर्जेदार करण्यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने आ. विजयसिंह पंडित यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बाबुराव सावंत, बळीभाऊ चव्हाण नवनाथ वेताळ, सरपंच विष्णुपंत घोंगडे, अशोक नाईकवाडे, अंकूश गायकवाड रामदास मुंढे, मंगेश कांबळे, महादेव जाधव, विलास माने, बाबुराव काकडे, राम लोणकर, कचरू काकडे, शिवाजी आतकरे, ज्ञानेश्वर काकडे, आसाराम काकडे, कल्याण ढेरे, दिलीप कुलकर्णी सखाराम लोणकर, अजय लोणकर, बाळु ढेरे, सरपंच मोहन काकडे उपसरपंच बाबासाहेब राठोड यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT